# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

क्रमांक:२अ/एडीएम/पडताळणी/२००९/ 2990
दिनांक : 18 JUL 2009

प्रति,
सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील प्रवेश प्रक्रियेअंतर्गत प्रवेश दयावयाच्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणेबाबत......

शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणा-या विवीध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत प्रवेश देण्यात येणा-या विद्यार्थ्यांची सर्व कागदपत्रे संबंधित संस्थांनी काळजीपूर्वक तपासून घेणे आवश्यक आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अर्ज स्विकृती केंद्र (ए आर सी ) कडून उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केली जात असली तरी काही वेळा कागदपत्रांमध्ये त्रुटी असतात व केवळ एआरसी मार्फत तपासणी झाली आहे असे समजून संस्था उमेदवारास थेट प्रवेश देऊन टाकतात. अंतिम गुणवत्ता यादी पडताळणीवेळी काही उमेदवारांची कागदपत्रे सादर केली नसल्याचे निदर्शनास येते . परिणामी विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करणे अथवा न्यायालयीन प्रकरण उद्भवण्याचे प्रकार घडतात.

या बाबी टाळण्यासाठी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना सूचित करण्यात यावे की, प्रवेश देतानाच उमेदवाराकडून त्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे संस्थेने तपासून घ्यावीत. विवीध अभ्यासक्रमांसाठी तपासून घ्यावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अभ्यासक्रमाचे नांव | मागासवर्गीय प्रवर्ग | आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे | | |
|---|---|---|---|---|
| | | **जात प्रमाणपत्र** | **जात वैधता प्रमाणपत्र** | **नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र** |
| अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र , वास्तुशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी **पदवी** तसेच एमबीए./ एमएमएस, एमसीए **पदव्युत्तर पदवी** | **SC, ST** | **आवश्यक** | **आवश्यक** | लागू नाही |
| | **VJDT/NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC** | **आवश्यक** | **आवश्यक** | **आवश्यक** |

- <u>जात प्रमाणपत्र (Caste Certificate) :</u> महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. तथापि सदर प्रमाणपत्रामध्ये **मायग्रेशन, अथवा जात महाराष्ट्राबाहेरील राज्यातील आहे असे नमूद केलेली जात प्रमाणपत्र मागासवर्गीय उमेदवार म्हणून प्रवेशासाठी ग्राहय धरली जाणार नाहीत .**

- <u>जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) :</u> **महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.**

- <u>नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र :</u> महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक५, दि.०५/०६/२००६ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार **महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि. ३१/०३/२०१० पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र** (Non-Creamy Layer Certificate) उमेदवाराकडून घेण्यात यावे.

<u>उपरोक्त प्रमाणपत्रापैकी **एखादे प्रमाणपत्र नसेल तर संबंधित उमेदवारास प्रवेश देऊ नये.**</u>

**तसेच शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रमांस** प्रवेश घेणाऱ्या सर्व उमेदवारांना **भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Indian Nationality Certificate) सादर करणे बंधनकारक आहे .**

- **कॅटगरी बी** मध्ये अर्ज करणारे जे उमेदवार इयत्ता १० वी व / किंवा १२वी महाराष्ट्र राज्याबाहेरून भारतातून कोणत्याही राज्यातून उत्तीर्ण झालेले उमेदवार तसेच **डिफेन्स कॅटगिरीसाठी** अर्ज करणा-या उमेदवारांना **महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे.** सदरचे अधिवास प्रमाणपत्र हे By Birth/ Permanent Resident **असे असणे आवश्यक** आहे. सदर प्रमाणपत्रात <u>**स्विकारलेले वास्तव्य (ॲक्सेप्टेड), बाय चॉईस, किंवा फॉर एज्युकेशन पर्पज** असे नमूद केलेले डोमिसाईल्ड प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येऊ नये.</u>

वरील बाबी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. तसेच उमेदवाराने आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास सदर उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल व त्यास सर्वस्वी सदर संस्था जबाबदार असेल हे ही संस्थांना सूचित करण्यात यावे.

( डॉ.एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

जा.क्र.विकापु/विवि/प्रथम वर्ष प्रवेश/ 6236 — दिनांक : 22 JUL 2009

प्रत : १) या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व पदवी व पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन संस्थांना कळविण्यात येते की, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचासलनालय, मुंबई यांनी पत्र क्र. २अ/एडीएम/पडताळणी/२००९/२११७ दिनांक १८/०७/२००९ मध्ये पत्रात नमुद केल्या प्रमाणे सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(गो. पं. चौधरी)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री. एस.बी. शिन्दे प्रोग्रॅमर यांना सुचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.